संस्कार मंदिर संचालित

# कला व वाणिज्य महाविद्यालय,

वारजे माळवाडी, पुणे – ५८.

# नियमित कार्यक्रम अहवाल

## ➢ २१ जुलै २०१८ " आंतरराष्ट्रीय योगा दिवस "

गुरुवार दि. २१/०७/२०१८ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३० यावेळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयातील ग्रंथपाल यांनी " दैनंदिन जिवनात योगाचे महत्व व निरोगी आरोग्य या विषयावर व्याख्यान देवून योगाची प्रात्यक्षिके करुन दाखविली व विद्यार्थ्यांकडून देखील प्रात्यक्षिके करुन घेण्यात आली.

## ➢ १ जुलै ते ३१ जुलै २०१८ " महावृक्ष अभियान "

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ जुलै २०१८ ते ३१ जुलै दरम्यान वन महोत्सव साजरा करण्यात आला. झाडे लावा,झाडे जगवा व एक विद्यार्थी एक झाड या घोष वाक्यांच्या आधारे वारजे परिसरातील वारजे उद्यानात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व परीसरातील सामाजिक कार्यकर्ते व मा.प्राचार्य यांच्या हस्ते वृक्ष लागवाड करण्यात आली. त्याच बरोबर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी दि.३१ जुलै २०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रा.से.योजनेच्या विभागात पाच स्वयंसेवक पाठविण्यात आले.

## ➢ १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१८ " स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान "

राष्ट्रीय सेवा योजने अतंर्गत दि. १ ते १५ ऑगस्ट दरम्यान स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले. सदर स्वच्छ पंधरवडयामध्ये सा.फु.पुणे विद्यापीठाने निर्देशित केल्या प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात आले.

१) दि.१ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयातील रा.से.योजनेतील विद्यार्थ्यांनी सर्वात प्रथम स्वच्छतेची शपथ घेतली.
२) दि. २ ते ५ ऑगस्ट दरम्यान सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या कालावधीत महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.
३) दि.६ ते ८ ऑगस्ट २०१८ रोजी वारजे परीसरातील पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागातील परीसर स्वच्छ करण्यात आला. तसेच त्यातून निरोगी आरोग्याचा संदेश देण्यात आला.
४) दि.९ ते १० ऑगस्ट २०१८ रोजी दररोज ३ तास याप्रमाणे वारजे रामनगर व परीसर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच सदर परीसरात घरोघरी जाऊन स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.
५) दि. ११ ते १३ ऑगस्ट दरम्यान माळवाडी येथील सामाजिक संस्थेस सदिच्छा भेट देण्यात आली. त्यामध्ये आपल घर या संस्थेतील अनाथ विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. यावेळी मा. विजय फळणीकर यांनी रा.से.योजनेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
६) दि. १४ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालायाच्या वतीने दत्तक घेतलेले आंगळंबे गाव येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता रॅली काढून गावक-यांना स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. सदर उपक्रमात एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व महाविद्यालयातील प्राध्यापक व इतर सहकारी यांचा समावेश होता.

- **३ ऑगस्ट २०१८ “ हम फिट तो इंडीया फिट ”**

दि. ३ ऑगस्ट २०१८ रोजी **हम फिट तो इंडीया फिट** या उपक्रमात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या दहा स्वयंसेवकांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रा.से.योजनेच्या  विभागात लेझीम साठी निवड करण्यात आली.

- **१५ ऑगस्ट २०१८ “ स्वातंत्र्यता दिन ”**

दि. १५ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत **स्वातंत्र्यता दिन** साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीप बराटे यांनी स्वातंत्र्यता दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संबोधित केले.

- **१४ सप्टेबंर २०१८ “ हरीत मित्र परीवार ”**

दि. १४ सप्टेंबर २०१८ रोजी हरीत मित्र परीवार यांच्या मार्फत डॉ. महेद्रं घागरे सरांनी रोपाची निर्मिती , लागवड, विदेशी वृक्षांचे बियाणे आणि चंदनाच्या बियाण्यांच्या उगवण क्षमते संदर्भात रा.से.योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

- **१५ सप्टेबंर २०१८ “ महाश्रमदानाचे आयोजन ”**

दि. १५ सप्टेंबर २०१८ रोजी महाविद्यालयात रा.से.यो व विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व परीसर स्व्च्छ करून श्रामदान करण्यात आले.

## ➢ २४ सप्टेबंर २०१८ “ राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन ”

दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दिलीपभाऊ बराटे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. तसेच या प्रसंगी डॉ. माने यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## ➢ २९ सप्टेबंर २०१८ “ सर्जिकल स्ट्राईक ”

गौरवार्थ विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा निर्माण व्हावी म्हणुन डॉ. दिपक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## ➢ २४ सप्टेबंर ते २ ऑक्टोबर २०१८ “ महात्मा गांधी जयंती ”

दि. २४ सप्टेंबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१८ रोजी महात्मा गांधी पंधरवडा साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील रा.से.योजना विभाग व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने “ राष्ट्रपिता महात्मा गांधी ” यांच्या १५० व्या जयंती निमित्त विविध उपक्रम घेण्यात आले.

## ➢ ०७ ऑक्टोबर २०१८ “ आठवणीतले पुणे व सायकलींचे पुणे ”

दि. ०७ ऑक्टोबर २०१८ रोजी “ आठवणीतले पुणे व सायकलींचे पुणे ” या उपक्रमासाठी सर परशूराम महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या ०५ स्वयंसेवकांना या सायकल रॅली साठी पाठविण्यात आले.

## ➢ १५ ऑक्टोबर २०१८ “ वाचन प्रेरणा दिन ”

दि. १५ ऑक्टोबर २०१८ रोजी महाविद्यालयात डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस “वाचन प्रेरणा दिवस ” म्हणुन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील ११० विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या वाचन कक्षात आठ तास पुस्तक ,ग्रंथ, कविता संग्रह आणि कादंबरीचे वाचन करण्यात आले. हा दिवस विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा दिवस ठरला.त्यातूनच वाचनाची गोडी व चिंतनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागली.

## ➢ ३१ ऑक्टोबर २०१८ “ राष्ट्रीय एकता दिवस ”

दि. ३० ऑक्टोबर २०१८ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्म दिवसा निमित्त “ राष्ट्रीय एकता दिवस” महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. स्वाती जगताप यांनी भारतीय ऐक्य या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. त्याच बरोबर डॉ. दिपक शिंदे यांचा लघु माहितीपट दाखविण्यात आला.

## ➢ ०५ डिसेंबर २०१८ “ जागतिक मानव अधिकार दिन ”

बुधवार दि. ०५ डिसेंबर २०१८ रोजी जागतिक मानवी अधिकार दिन साजरा करताना प्रा. रायसिंग पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून प्रत्येकाला स्वातंत्र्यपणे जगण्याचा अधिकार असून इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही असे विचार त्यांनी मांडले.

## ➢ १९ जानेवारी २०१९ “ युवा सप्ताह ”

दि. १२ जानेवारी २०१९ रोजी स्वामी विवेकानंद जयंती , राजमाता जिजाऊ जयंती व युवा दिन साजरा करताना काव्यवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि.१३ जानेवारी २०१९ रोजी प्रा.डॉ.स्वप्नील गायकवाड यांनी “स्वामी विवेकानंदाचे विचार व

आजचा युवक ” या विषयावर व्याख्यान दिले. तसेच दि.१५ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान हा उपक्रम राबविण्यात आला. सदर स्व्च्छतेमध्ये सर्व वर्ग, ग्रंथालय व आजुबाजूचा परीसर स्वच्छ करण्यात आला.

दि. १८ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालय परिसरात प्लास्टिक मुक्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या वस्तू , बाटल्या, कॅरीबॅग व प्लास्टीक न वापरण्या संदर्भात परीसरातील नागरीकांची जनजागृती केली. दि. १९ जानेवारी २०१९ रोजी सदर सप्ताहाची सांगता प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे सरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## ➢ २६ जानेवारी २०१९ “ प्रजासत्ताक दिन ”

दि. २६ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दिलीपभाऊ बराटे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ. दिलीप भोईटे सर , प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यां समवेत साजरा केला.

## ➢ ३० जानेवारी २०१९ “ हुतात्मा दिन ”

दि. ३० जानेवारी २०१९ रोजी हुतात्मा दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त करुन हुतात्म्यांना श्रदधाजंली अर्पण करण्यात आली.

## ➢ ०८ मार्च २०१९ “ आंतरराष्ट्रीय महिला दिन ”

दि. ०८ मार्च २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. आधुनिक काळात महिलाशक्ती देशाचे प्रेरणास्थान असून महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांबरोबर समान पातळीवर काम करतात. त्याच बरोबर विद्यार्थ्यांमध्ये महिलांचा सन्मान या विषयावर चर्चा करण्यात आली.

- **०८ मार्च २०१९ ते २२ मार्च २०१९ “ पोषण पंधरवडा ”**

दि. ०८ मार्च ते २२ मार्च २०१९ या काळात “पोषण पंधरवडा” साजरा करण्यात येणार आहे . त्यामध्ये रॅली, पदयात्रा, चर्चात्मक संवाद व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन होणार आहे.